# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
दूरध्वनी क्र. ०२०–२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स ०२०–२५६९७५११

संदर्भ: विक्रीमं/३/1394 दिनांक: २५ एप्रिल, २०१९.

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेली सर्व**
**महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.**

**विषय : खेळाडू पात्रता फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत.....**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून आंतर महाविद्यालयीन स्पर्धेकरीता खेळाडू पात्रता फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबतचा ठराव दि. ०७ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या सभेत करण्यात आला आहे. त्याबाबत यापूर्वी विक्रीमं/३/२८० दि. ८ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या पत्रानुसार आपल्या महाविद्यालय/संस्थेतील खेळाडूंचे पात्रता फॉर्म दि. ०९ ऑगस्ट, २०१८ ते दि. २५ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत प्राथमिक स्वरूपात **(Demo)** भरावयासाठी खालील लिंक सुरू ठेवण्यात आली होती. उपरोक्त झालेल्या ठरावानुसार शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून ऑनलाईन पध्दतीनेच खेळाडू पात्रता फॉर्म स्विकारून मगच संबंधित खेळाडूस आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. याबाबत आपल्या महाविद्यालय/संस्थेत शारीरिक शिक्षण संचालक यांना याबाबत सुचित करावे, जर वरील पद रिक्त असल्यास आपल्या पातळीवर उपरोक्त कामाकरीता स्पोर्टस इनचार्ज नियुक्त करून त्यांचेकडून सदरचे खेळाडू पात्रतेचे फॉर्म भरून घ्यावेत. जर ऑनलाईन खेळाडू पात्रता फॉर्म नसल्यास सदर खेळाडू स्पर्धेत सहभागावाचून वंचित राहू शकणार असून त्याची पूर्णत: जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/संस्थेची राहणार आहे. खालील लिंकवर फॉर्म उपलब्ध होतील.

**BOD → BOD Online→ Login → For College Users वरून User Name, Password टाकून खेळाडू पात्रता फॉर्म भरणे.**

कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

डॉ. दिपक माने
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ,
अधिष्ठाता, आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा